आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता
६ मे २०२६ - बुधवार

**ठळक बातम्या**

- पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तमिळनाडू आणि पुदुचेरीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्याची अधिसूचना जारी

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्यात आज विविध मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा

- भविष्यातले आर्थिक धक्के पचवण्यासाठी भारत सक्षम असल्याचा मूडीजचा अहवाल

**आणि**

- अमेरिकेची प्रोजेक्ट फ्रीडम मोहीम स्थगित झाल्यानंतर कच्च्या तेलाच्या दरात घट

**<><><><><><>**

पश्चिम बंगाल, आसाम, केरळ, तमिळनाडू आणि पुदुचेरीमध्ये निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाली असून तशी अधिसूचना निवडणूक आयोगाने जारी केली आहे. नवीन विधानसभा स्थापना झाली असल्याचं संबंधित राज्यांच्या राज्यपाल किंवा नायब राज्यपालांना निवडणूक आयोगाने कळवलं आहे. मतदान ते मतमोजणीपर्यंतची निवडणूक प्रक्रीया कायदेशीर चौकटीचं पालन करत, मुक्त, निष्पक्ष आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यात आली असल्याचं निवडणूक आयोगानं या पत्रात म्हटलं आहे. या अधिसूचनेनंतर निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींच्या शपथविधीचा आणि राज्यात नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा झाला आहे.

**<><><><><><>**

आसामात मुख्यमंत्री हिमंता बिस्व सर्मा यांनी पदाचा राजीनामा राज्यपाल लक्ष्मणप्रसाद आचार्य यांच्याकडे सुपूर्द केला. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत ते

काळजीवाहू मुख्यमंत्री असतील. नवीन सरकारचा शपथविधी येत्या ११ मेनंतर होण्याची शक्यता असल्याचं त्यांनी गुवाहाटीत वार्ताहरांना सांगितलं. आसाममधे रालोआने १२६ पैकी १०२ जागा मिळवून स्पष्ट बहुमत मिळवलं आहे. विधिमंडळ पक्ष नेता निवडीसाठी केंद्रीय मंत्री जे पी नड्डा यांची निरीक्षक म्हणून तर हरियाणाचे मुख्यमंत्री नायबसिंह सैनी  यांची सह निरीक्षक म्हणून नियुक्ती झाली आहे.

पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीत प्रचंड बहुमत मिळवल्यानंतर विधिमंडळ पक्षाच्या नेत्याच्या निवड प्रक्रियेसाठी भाजपाने निरीक्षक नेमले आहेत. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा निरीक्षक, तर ओडिशाचे मुख्यमंत्री मोहन चरण मांझी हे सहनिरीक्षक असतील. येत्या शनिवारी नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी होण्याची शक्यता आहे.

तमिळनाडूमध्ये, विधानसभा निवडणुकांमध्ये सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयाला आलेल्या टी. व्ही. के. पक्षाचे नेते जोसेफ विजय हे आज राज्यपालांची भेट घेऊन राज्यात नवीन सरकार स्थापन करण्यासाठी प्रस्ताव सादर करतील अशी माहिती पक्षाकडून देण्यात आली. राज्यात सरकारस्थापनेची प्रक्रीया सुलभ करण्यासाठी टीव्हीकेला पाठिंबा देण्याचा निर्णय काँग्रेसने घेतला आहे. काँग्रेस नेते कार्ती चिदंबरम यांनी ही माहिती दिली. ....

**होल्ड- बाईट- चिदंबरम**

मात्र द्रमुकने याबाबत विश्वासघात झाल्याची भावना व्यक्त केली आहे. केरळमध्ये सत्ता स्थापनेच्या संदर्भात युडीएफमध्ये अनौपचारिक बैठका सुरू आहेत. काँग्रेसमधे मुख्यमंत्रिपदासाठी नाव निश्चित करण्यासाठी चर्चा सुरु आहे.

पुदुच्चेरीमधे एआय एनआरसीचे एन. रंगासामी पुन्हा एकदा मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतील. मित्रपक्ष भाजपाचे ४ आमदार निवडून आले आहेत. ए. नमस्सिवायम यांची भाजपा विधिमंडळ पक्षाच्या नेतेपदी निवड करण्यात आली.

**<><><><><><>**

पश्चिम बंगालमधे सरकारी कार्यालयांमधे कार्यरत असलेल्या सेवानिवृत्त अधिकाऱ्यांना आजपासून कार्यालयात न येण्यास सांगण्यात आलं आहे. लोकभवन आणि राज्याचे मुख्य सचिव दुष्यंत नरियाला यांच्या सूचनेनुसार सर्व विभागांच्या सचिवांनी हे तोंडी आदेश दिले आहेत. नवीन सरकार स्थापन होईपर्यंत हे आदेश लागू असतील. तृणमूल काँग्रेसचा विधानसभा निवडणुकीत पराभव झाल्यानंतर सरकारच्या प्रशासनातल्या अनेक सल्लागारांनी पदभार सोडला. यात अल्पन बंडोपाध्याय, हरिकृष्णा द्विवेदी, मनोज पंत आणि अभिरूप सरकार यांचा समावेश आहे. कोणत्याही विभागातून एकही कागदपत्रं किंवा फाईल बाहेर जाता कामा नये, असे निर्देशही राज्याच्या मुख्य सचिवांनी दिले आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि व्हिएतनामचे राष्ट्राध्यक्ष तो लाम यांच्यात आज विविध मुद्द्यांवर द्विपक्षीय चर्चा होत आहे. या चर्चेनंतर दोन्ही नेते संयुक्त निवेदन देणार आहेत.

तीन दिवसांच्या भारत दौऱ्यावर आलेले तो लाम यांचं आज नवी दिल्लीत राष्ट्रपती भवनात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी औपचारिक स्वागत केलं. याप्रसंगी पियुष गोयल, अश्विनी वैष्णव आणि डॉ. जितेंद्र सिंह यांच्यासह केंद्रीय मंत्री उपस्थित होते. त्यानंतर लाम यांनी राजघाट इथे जाऊन महात्मा गांधी यांच्या समाधीचं दर्शन घेतलं आणि त्यांना आदरांजली वाहिली.

**<><><><><>**

मजबूत परकीय चलनसाठा, स्थिर धोरणात्मक चौकट आणि देशांतर्गत भांडवली बाजार यांच्या बळावर भारत भविष्यातले आर्थिक धक्के पचवण्यासाठी सक्षम आहे, असं मुडी या संस्थेच्या अहवालात म्हटलं आहे. गेल्या पाच वर्षांतल्या जगातल्या उदयोन्मुख बाजारपेठांपैकी भारत एक आहे, असंही या अहवालात

म्हटलं आहे.  जागतिक अस्थिरतेच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेबद्दल या अहवालातून सकारात्मक निरीक्षण मांडण्यात आलं आहे. भारताच्या मौद्रिक धोरण चौकटीमुळे चलनवाढ स्थिर ठेवायला मदत झाल्याचं यात म्हटलं आहे.

<><><><><>

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी होर्मुजच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या जहाजांना सुरक्षा प्रदान करण्यासाठी सुरू केलेली प्रोजेक्ट फ्रीडम ही मोहीम स्थगित करण्याची घोषणा केल्यानंतर आज आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरात घट झाली. ब्रेंट क्रूड ऑईलचे दर १ पूर्णांक २१ शतांश टक्क्यानी घटून १०८ अमेरिकन डॉलर प्रति बॅरल झाले असून यूएस वेस्ट टेक्सास इंंटरमेडिएट फ्यूचर्स चे दरही १ पूर्णांक ७६ शतांश टक्क्यांनी घटून १०० डॉलर प्रति बॅरल झाले आहेत. दर कमी झाले असले तरीही जागतिक बाजारात अजूनही तेलाचा तुटवडा जाणवत आहे.

<><><><><>

भारताच्या अध्यक्षतेखाली 'ब्रिक्स' 'च्या रोजगार कार्यगटाची' दुसरी बैठक आज केरळची राजधानी तिरुवनंतपुरम इथं सुरू होणार आहे. या दोन दिवसीय बैठकीत रोजगार आणि कामगार कल्याण, सामाजिक सुरक्षा प्रणाली भक्कम करणे, कारभारात महिलांचा सहभाग वाढवणे आणि इतर अनेक विषयांवर ब्रिक्स सदस्य राष्ट्रांचे प्रतिनिधी विचारमंथन करतील. कामगारांपर्यंत विशेषतः गिग वर्कर्स पर्यंत लाभ पोहोचवण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाच्या उपयुक्ततेवरही या बैठकीत चर्चा होणार आहे. ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका, सौदी अरेबिया, इजिप्त, इथिओपिया, इराण, इंडोनेशिया आणि संयुक्त अरब अमिराती यांचा ब्रिक्स सदस्य राष्ट्रांमध्ये समावेश आहे.

<><><><><>

वेव्ह्ज डॉक बाजारच्या दुसऱ्या आवृत्तीचं आयोजन पुढच्या महिन्यात एकोणिसाव्या मुंबई आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवासोबत करण्यात येणार आहे. येत्या १६ ते १८ जून दरम्यान मुंबईत एनएफडीसी संकुलात याचं आयोजन केलं जाईल. वेव्ह्ज डॉक बाजार हे माहितीपट, ॲनिमेशन आणि लघुपट निर्मात्यांच्या प्रवासाला चालना देण्यासाठी तयार केलेलं एक प्रमुख व्यासपीठ आहे. या व्यासपीठाच्या माध्यमातून निर्मात्यांना सहयोग, मार्गदर्शन, बाजारपेठेतला प्रवेश आणि जागतिक ओळख निर्माण करण्याची संधी दिली जाते. वेव्ह्स डॉक बाजारमधील व्ह्यूइंग रूम आणि वर्क-इन-प्रोग्रेस लॅबसाठी प्रवेश आता खुले झाले आहेत. इच्छुक निर्माते येत्या १५ मेपर्यंत आपले अर्ज सादर करू शकतात.

**<><><><><>**

युक्रेनच्या पूर्व भागात काल रात्री रशियानं केलेल्या बॉम्ब हल्ल्यात युक्रेनच्या २७ नागरिकांचा मृत्यू झाला. युक्रेननं दिलेल्या युद्धबंदीच्या प्रस्तावाच्या काही तास आधीच हे हल्ले करण्यात आले आहेत. रशिया हल्ले थांबवण्याच्या ऐवजी ते वाढवत असल्याचं युक्रेनचे परराष्ट्रमंत्री एड्रील सायबिहा यांनी म्हटलं आहे. युक्रेनच्या झापोर्झिया भागात झालेल्या बॉम्बहल्ल्यात १२ जणांचा तर कारास्ट्रोव्ह आणि पोल्टावा भागातही काही जणांचा मृत्यू झाला आहे. संयुक्त राष्ट्रसंघानं तातडीनं युद्धबंदी करुन शांतता प्रस्थापित करण्याचं आवाहन केलं आहे.

**<><><><><>**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट संघटना -आयसीसीने पुरुष गटाची नवीन टी ट्वेंटी सांघिक क्रमवारी जाहीर केली आहे. या यादीत भारत अव्वल स्थानी कायम आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारताने २७५ गुणांसह अव्वल स्थान पटकावले आहे. इंग्लंड २६२ गुणांसह दुसऱ्या तर ऑस्ट्रेलिया २५८ गुणांसह तिसऱ्या स्थानी आहे.

**<><><><><><>**

आयपील क्रिकेट स्पर्धेत आज सनरायझर्स हैद्राबादचा सामना  पंजाब किंग्ज बरोबर होत आहे. हैद्राबादच्या राजीव गांधी मैदानावर संध्याकाळी साडेसात वाजता हा सामना सुरु होईल.

काल झालेल्या सामन्यात चेन्नई सुपरकिंग्जनं दिल्ली कॅपिटल्सचा ८ गडी राखून पराभव केला. दिल्ली कॅपिटल्सनं प्रथम फलंदाजी करतांना १५५ धावा केल्या. हे आव्हान चेन्नई सुपरकिंग्जनं केवळ २ गड्यांच्या मोबदल्यात १७ षटकातच पूर्ण केलं.

**<><><><><><>**

हिमाचल प्रदेशात तसंच राजस्थानात अनेक ठिकाणी काल वादळी पाऊस झाला. मध्य प्रदेशातल्या २८ जिल्ह्यांना तसंच बिहार आणि पश्चिम बंगालमधे काही भागात भारतीय हवामान विभागानं  विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचाऑरेंज अलर्ट दिला आहे. अरुणाचल प्रदेश, मेघालय, आसाम, सिक्कीम, तामिळनाडू, पुदुच्चेरी, कराईकल, केरळ आणि माहे या भागांतही आज मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. आंध्र प्रदेश, कोकण आणि गोव्यामध्ये हवामान उष्ण आणि दमट राहील. केरळात येत्या दोन दिवसात मुसळधार पाऊस होईल तसंच सोसाट्याचे वारे वाहतील असा अंदाज आहे.

**//<><><><><><>//**